नियमित फौ.ख.क्र. ३११/२०२२
सरकार वि. रबानी
नि.क्र. खाली

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०२ शपथेवरः-**

माझे नाव - ज्ञानेश्वर बाबुराव चिल्ले,
वय ४५ वर्षे, कामधंदा - शेती,
रा. लामजना, ता. औसा, जि. लातूर.

**सरतपास विद्वान सरकारी अभियोक्ता श्री एस. एस. वाघमारे मार्फत शपथेवर सुरु :-**

दि.१३.०२.२०२२ रोजी पंचनाम्यासाठी मौजे किल्लारी येथे पोलीस स्टेशनमध्ये पंचनाम्यासाठी बोलावले होते. त्यावेळी माझयासोबत लक्ष्मण कांबळे हे होते. आरोपी रबानी यांनी गुन्हयात वापरलेली सळई झुडपातुन काढुन देतो असे निवेदन पोलीसांना दिलेले होते. सदरचा निवेदन पंचनामा आमच्यासमक्ष करण्यात आला. आता मला सदरचा निवेदन पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी, दुसरे पंच लक्ष्मण कांबळे, आरोपी रबानी आणि पोलीस अधिकारी यांची सही आहे. त्यातील सर्व मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी क्र. पी-३/पी.डब्ल्यु-२ देण्यात येते.

२. त्यानंतर आम्ही पोलीस गाडीने जोगन चिंचोली - सिरसल-लामजना मार्गे आरोपी रबांनीच्या शेतामध्ये गेलो. त्या ठिकाणी आरोपी रबानी यांनी झुडपात ठेवलेली सळई काढुन दिली. पोलीसांनी त्याचा जप्ती पंचनामा केला. सदरचा पंचनामा दाखवल्यास मी ओळखु शकतो. सदरचा जप्ती पंचनामा मला दाखवण्यात आला. त्यावर माझी, दुसरे पंच लक्ष्मण कांबळे, आरोपी रबानी आणि पोलीस अधिकारी यांची सही आहे. त्यातील सर्व मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी क्र. पी-४/पी.डब्ल्यु-२ देण्यात येते. सदर सळई जप्त करून पोलीस घेवुन गेले.

३. सदरच्या जप्त मुदेमालातील सळईया दाखवण्यात आल्या. त्यापैकी एक सळई पोलीस स्टेशनमध्ये दाखवण्यात आली होती आणि दुसरी सळई आरोपी रबानी यांनी झुडपातुन काढुन दिलेली होती.

४.	दि. २१.०२.२०२२ रोजी पोलीसांनी मला किल्लारी पोलीस स्टेशनला बोलावुन घेतले. त्यावेळी माझयासोबत लक्ष्मण शिवनाथ कांबळे, आरोपी आजम देखील हजर हे होते. आरोपी आजम यांनी गुन्हयात वापरलेली सळई पोलीससमक्ष हजर केली. पोलीसांनी त्याचा जप्ती पंचनामा केला. आता मला सदरचा जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी, दुसरे पंच लक्ष्मण कांबळे, आरोपी आजम आणि पोलीस अधिकारी यांची सही आहे. त्यातील सर्व मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी क्र. पी-५/पी.डब्ल्यु-२ देण्यात येते. सदर घडनेला दोन ते अडीच वर्ष झालेले आहेत. सदरची सळई ६२ एम.एम.ची होती. जप्त मुदेमालातील सळईया दाखवण्यात आल्या. त्यापैकी एक सळई पोलीस स्टेशनमध्ये जप्त करण्यात आली होती.

५.	आरोपी रबानी आणि आजम यांना पाहिल्यास मी ओळखु शकतो. दोन्ही आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास संपला.**

**आरोपी क्र.०१ ते ०३ यांनी साक्षीदाराचा उलट तपास घेण्याचे नाकारले. आरोपीचा कामकाज तहकुबीचा अर्ज नामंजुर करण्यात आल्यामुळे आरोपींविरूध्द उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात येतो.**

**उलटतपास नाही.**

**फेरतपास नाही.**

सा.वा.दा.अ.ब.अ.कबूल केले.

Digitally signed by NALAWADE SHUBHANGI HEMANT
Date: 2026.06.19 16:15:21 +0530

(एस. एच. नलावडे)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
औसा
दि. १९.०६.२०२६

माझे समक्ष,

Digitally signed by NALAWADE SHUBHANGI HEMANT
Date: 2026.06.19 16:15:14 +0530

(एस. एच. नलावडे)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
औसा
दि. १९.०६.२०२६